


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १२१, शुक्रवार १९ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर दर्शनचे वृत्त आणि कामाला सुरुवात!

## पोलीस निरीक्षक संभाजीराव गायकवाड यांचे गौरोद्गार



**पारनेर : संजय मोरे**

**पारनेरला बदलून आलो, त्याच दिवशी तालुक्यातील उत्तर भागातील पोखरी येथे दरोडा पडला आणि पारनेर दर्शनचे प्रतिनिधी संजय मोरे यांनी पहिल्या पानावर पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना दरोडेखोरांची सलामी या मथळ्याखाली वृत्त छापले. त्याच बातमीत मी जामखेड येथे चांगले काम केले असा ही उल्लेखही केला. या वृत्ताची दखल घेत पारनेर तालुक्यात चांगले काम करण्याचा चंग बांधला असे सांगत पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी पारनेर दर्शनच्या कामाचे कौतुक केले. पारनेर येथून नगर येथील आर्थिक गुन्हे शाखेत बदली झाल्यानंतर गायकवाड यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे होते.**

गायकवाड म्हणाले, पारनेरला बदलून आल्यानंतर मनामध्ये अनेक शंका आल्या.पारनेर तालुका हा पुरोगामी विचारांचा तालुका आहे. येथे वैचारिकता जपणारी माणसं आहेत, १० महिन्याच्या नोकरीच्या काळात मी पारनेरकरांचा होऊन गेलो. सर्वांच्या सहकाऱ्यातून चांगले काम करता आले याचे समाधान वाटते असे गायकवाड म्हणाले.

गायकवाड पुढे बोलताना म्हणाले, मी पारनेरला आल्यानंतर सर्व सामान्य कुटुंबातील व्यक्तींना माझे कुटुंब समजून काम करू लागलो. लोकांच्या मनातील पोलिसांची आत्मियता वाढवत गेलो आणि त्यातूनच चांगले काम होत गेले.येथून जाताना पारनेरकरांचे प्रेम जिव्हाळा हा कधी विसरता येणार नाही. पारनेरकरानी माझा सर्व समावेशक असा गुणगौरव केला ती माझी आयुष्यभराची शिदोरी आहे.सेनापती बापटांच्या, अण्णासाहेब हजारे यांच्या तालुक्यात चांगले काम करता आल्याचे समाधान वाटते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय वाघमारे यावेळी बोलताना म्हणाले, पोलिस आणि पत्रकार एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. पत्रकारांनी व्यवस्थेच्या विरोधी राहून काम केले पाहिजे, तरच खरा पत्रकारितेचा अर्थ कळेल. मात्र आज तसे होताना दिसत नाही अशी खंत व्यक्त केली. पोलिस निरीक्षक गायकवाड यांनी चांगले काम करून अवघड गुन्ह्यांचा तपास करून एका नवा आदर्श उभा केल्याचे वाघमारे यांनी सांगितले.

यावेळी मार्तंडराव बुचडे माजी नगराध्यक्ष विजय औटी ॲड.राहुल झावरे,शाहीर गायकवाड,किरण ठुबे,सचिन वराळ ,युवराज पठारे ,बाबाजी वाघमारे ,महिला पोलिस कॉन्स्टेबल शितल पठारे सह पोलिस कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सुत्र संचालन दत्ता गाडगे यांनी केले तर पीएसआय उगले यांनी आभार मानले.

या प्रसंगी ॲड.राहुल झावरे, नगरसेवक युवराज पठारे,पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे,राज्य मराठी पत्रकार संघाचे नगर दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, शाहीर भास्कर गायकवाड यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

### स्वच्छ प्रतिमा

**पोलिस निरीक्षक संभाजीराव गायकवाड यांनी दहा महिन्याच्या काळात पोलिसातील माणुस जागृत करून सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून एक स्वच्छ प्रतिमा तयार केली कामाच्या माध्यमातून जी साखर पेरणी केली म्हणूनच सर्व स्थरातील नागरिकांनी या सत्कार सोहळ्यास हजेरी लावली आहे.**

**संजय मोरे**
कार्याध्यक्ष, राज्य मराठी
पत्रकार संघ पारनेर.

# तोडगा फिडगा काही निघाला नाही!

## ■ मनोज जरांगे मुंबई मोर्चावर ठाम ■ सगेसोयरेवर राज्य सरकारकडून दिशाभूल

**आंतरवाली सराटी : प्रतिनिधी**



**मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अद्याप कोणताही तोडगा निघाला नाही. सरकार या प्रकरणी उगीच मराठा समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी स्पष्ट केले. आपण आपल्या मुंबई दौऱ्यावर ठाम असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला.**

मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी २० जानेवारी रोजी मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. ते २० जानेवारी रोजी सकाळी ९ वा. जालन्याच्या आंतरवाली सराटीतून निघतील. त्यानंतर मजल दरमजल करत ते मुंबईला धडक देतील. त्यांच्या या आंदोलनाकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष्य लागल्याच्या पार्श्वभूमीवर आज माध्यमांत मराठा आरक्षणावर अंतिम तोडगा निघाल्याचा दावा केला. पण मनोज जरांगे यांनी गुरुवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना या बातम्यांत कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणावर कोणताही तोडगा - फिडगा निघाला नाही. या प्रकरणी सगेसोयरेच्या मुद्यावर कोणताही तोडगा निघाला नाही. या प्रकरणी सरकारकडून केवळ दिशाभूल केली जात आहे. सरकारने मुंबई दौऱ्यात विघ्न निर्माण करण्यासाठी आमच्याविरोधात ट्रॅप रचण्यात षडयंत्र रचले आहे. यासाठी मराठा समाजातीलच काही असंतुष्ट नेत्यांची मदत घेतली जात आहे. त्यांना सरकारची फूस आहे. पण आम्ही त्यांचा हा कट उधळवून लावू, असे जरांगे म्हणाले.

### कायद्याचे हात लांब - आखूड काही चालणार नाही

मराठा समाज आता कुणालाही घाबरणार नाही. आता आम्ही आमच्याविरोधात येणाऱ्यांना सरळ करणार आहे. आता आमच्या मुलांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आमच्या २५० बांधवांनी आत्महत्या केल्या आहेत. सरकारने भानावर येऊन या प्रकरणी गोडीगुलाबीने सकारात्मक तोडगा काढावा लागेल. मराठ्यांना मुंबईत पाय टाकू देणार नाही किंवा कायद्याचे हात लांब - आखूड असे आता काहीच चालणार नाही हे संबंधितांनी लक्षात घ्यावे, असा टोलाही त्यांनी यावेळी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हाणला.

### सरकारच्या ट्रॅपला भीक घालत नाही

मी सरकारच्या कोणत्याही ट्रॅपला भीक घालत नाही. मुंबईला येणाऱ्या मराठा बांधवांनी २० तारखेला आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघायचे आहे. विशेषतः न येणाऱ्या मराठ्यांनी आम्हाला निरोप देण्यासाठी यावे. मराठवाड्यातील सर्व मराठ्यांनी घराबाहेर पडावे. कुणीही उद्रेक, जाळपोळ करायची नाही. असे करणाऱ्यांनी येऊही नये. सर्वांनी शांततेत चालायचे. रस्त्यात येणाऱ्या गावकऱ्यांनी रस्त्यावर स्टॉल लावून आपल्या बांधवांच्या खाण्यापिण्याची सोय करावी, असेही मनोज जरांगे यावेळी मराठा समाजाला आवाहन करताना म्हणाले.

### ५४ लाख लोकांना कुणबी प्रमाणपत्र द्या

सरकारने उगीचच हा विषय ताणू नये. ५४ लाख लोकांना कुणबी प्रमाणपत्र द्या. तुम्ही मागील ३-४ महिन्यांत मोठ्या चुका केल्या. पुढील एका दिवसात नोंदी सापडलेल्या लोकांच्या नातलगांना प्रमाणपत्र द्या. आम्हाला मुंबईला येण्याची हौस नाही. पण सरकारने आम्हाला येथे येऊन वेड्यात काढू नये. या प्रकरणी सरकारने संभ्रम निर्माण करू नये. तसेच मराठा समाजानेही आपली दिशाभूल करून घेऊ नये, असे ते राज्य सरकारला ठणकावत म्हणाले.

### मी सरकारच्या गोळ्या झेलण्यास तयार

मुंबईला गेल्यानंतर मी आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. सरकारने मला गोळ्या घालून ठार केले तरी चालेल. पण मराठा बांधवांनी आपली एकजूट सुटू देऊ नका. माझे विचार मरू देऊ नका. आंदोलन थांबवू नका. तरच माझे बलिदान सार्थक होईल, अन्यथा नाही, असेही जरांगे यावेळी म्हणाले. माझ्याविरोधात ट्रॅप रचणाऱ्या नेत्यांची नावे मुंबईला निघाल्यानंतर जाहीर करणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी नेत्यांना दिला.

# अजितदादांचा ठाकरे गटाला धक्का

## अकोल्याच्या डॉ.मोरेंच्या हाती राष्ट्रवादीचा झेंडा



**मुंबई : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अकोले तालुकाप्रमुख डॉ. मनोज मोरे यांनी समर्थकांसह, तसेच अकोले मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बुधवारी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. देवगिरी बंगल्यावर हा प्रवेश पार पडला.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या हस्ते, आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्ह्यातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला.

याशिवाय प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागीरदार यांच्या पुढाकाराने धुळे शहरातील विविध राजकीय पक्षातील प्रमुख कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले तसेच त्यांना सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, प्रदेश सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार बाबाजानी दुर्राणी, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, धुळे शहर जिल्हा कार्याध्यक्ष जावेद बिल्डर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गाडीत कोण बसले... किती बसले... अरे !

## उपमुख्यमंत्री अजित पवार संतापले

**मुंबई: प्रतिनिधी**



**मुख्यमंत्री-दोन उपमुख्यमंत्री, मंत्री गिरीश महाजन आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा गाडीतील दाटीवाटीत बसलेला व्हिडीओ समाज माध्यमांत मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या व्हिडीओवर विरोधकांकडून बरीच टीका झाली. याच व्हायरल व्हिडीओवर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार चांगलेच खवळले. व्हिडीओ व्हायरल करणारा मूर्ख आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार उर्वरीत पान ३ वर

# आमदार अपात्रतेचा निर्णय आश्चर्यजनक असेल !

## ■ आ. रोहित पवार यांच्या विश्वास ■ राष्ट्रवादी फुटीवर ३१ जानेवारीला निकाल

**जामखेड :प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी पक्षात पडलेल्या फुटीप्रकरणी आमदार अपात्रतेचा महत्त्वाचा निकाल ३१ जानेवारी रोजी दिला जाणार आहे. हा निकाल आश्चर्यजनक असेल, अजित पवार मित्र मंडळाच्या विरोधात निर्णय घेतल जाईल, विश्वास शरद पवार गटातील आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला. तसेच आज कुठेतरी एकाला ताकद देण्याचे मात्र त्याचवेळी एकाची ताकद संपवण्याचे काम सुरू असून विधानसभा निवडणुकीपूर्वी दोघांचीही ताकद संपवली जाईल, असा दावाही रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला.**

जामखेड तालुक्यातील खर्डा येथे संत गितेबाबा यांच्या मठाच्या विविध कामाचे भूमिपूजन झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत आ. रोहित पवार बोलत होते. शरद पवार यांच्या वयावरून अजित पवारांकडून वारंवार मुद्दा समोर आणला जात असताना भारतीय जनता पक्ष काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना ऑफर देण्याचा प्रयत्न करत असल्याच्या चर्चेवर आमदार रोहित पवार यांनी टीका केली.

भाजप सगळ्यांनाच ऑफर देते, त्यांच्याकडे वय वर्ष ८० झालेले लोक खासदार झालेले आहेत. मात्र कुठेतरी अजितदादा मित्र मंडळाचे नेते जो वयाचा उर्वरीत पान ३ वर






स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती
# शिवार

## चवळी लागवड

**खरीप पिकाची काढणी झाल्यानंतर ताबडतोब जमिनीची मशागत करून चवळी लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. लागवडीसाठी कोकण सदाबहार, कोकण सफेद, सी-१५२ या जातींची निवड करावी.मध्यम आणि भारी जमिनीत चवळीचे चांगले उत्पादन येते. या पिकासाठी जमिनीचा सामू उदासीन असावा. पूर्व पिकाची काढणी केल्यानंतर जमीन नांगरून घ्यावी. कुळवाच्या साह्याने १ ते २ पाळ्या देऊन जमीन लागवडीयोग्य करावी. शेवटच्या कुळवणीवेळी हेक्टरी पाच टन शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. शेवटी लागवडीसाठी योग्य आकाराचे सपाट वाफे तयार करावेत.**

१) पेरणी १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण करावी. डिसेंबरनंतर पेरणी केल्यास उत्पादनात कमालीची घट येते. प्रतिहेक्टरी २५ ते ३० किलो बियाणे लागते.

२) प्रथम प्रतिकिलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत वाळवून त्यानंतर प्रति१० किलो बियाणास रायझोबियम जीवाणू संवर्धकाची २५० ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत सुकवून पेरणीसाठी वापरावे.

३) पेरणी टोकण पद्धतीने किंवा पाभरीने करावी. पेरणीसाठी पसरट जातीकरिता ४५ सेंमी आणि उभट जातीकरिता ३० सेंमी अंतर ठेवावे. दोन रोपांमधील अंतर १० ते १५ सेंमी ठेवावे.

४) पाभरीने पेरणी केल्यास पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून दोन रोपांमधील अंतर १० ते १५ सेंमी ठेवावे.

५) प्रतिहेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खताशिवाय हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद द्यावे. खताची संपूर्ण मात्रा पेरणीवेळी द्यावी. खते ओळीमध्ये बियांखाली ५ ते ७ सेंमी खोलीवर दिल्यास पिकाची वाढ चांगली होते. खते आणि बियाणे एकाच वेळी पेरणीची सोय असलेल्या दोन चाडीच्या पाभरीच्या साह्याने दिल्यास खताचा अपव्यय टळतो.

६) उर्वरित ओलाव्यावर चवळीची लागवड ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये केली जाते. जमिनीमध्ये पाण्याचा साठा उपलब्ध असेपर्यंत पिकाची वाढ चांगली होते. परंतु, पुढे फुले येण्याचा काळ तसेच दाणे भरण्याचा आणि पक्व होण्याच्या कालावधीत पाण्याची कमतरता भासल्यास उत्पादनामध्ये कमालीची घट येते. अशा वेळेस पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेमध्ये २-३ संरक्षित पाणी दिल्यास पिकाची वाढ चांगली होऊन उत्पन्न चांगले मिळते.

७) चवळीसाठी पेरणीनंतर १५ ते ३० दिवस हा तण नियंत्रणासाठी अतिमहत्त्वाचा कालावधी आहे. या कालावधीत तणांचे नियंत्रण न केल्यास उत्पन्नामध्ये १५ ते ३० टक्के घट येते. त्यासाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी कोळपणी करून ३० दिवसांनी निंदणी करावी किंवा पेरणीनंतर १५ आणि ३० दिवसांनी निंदणी करून पीक तणमुक्त ठेवावे.

## मटकी



(मठ; हिं. मोट; गु. मठ, मट; क. मडिके; सं. मुकुष्टक, वनमुग्द; इं. ॲकोनाइट बीन, मट अथवा मॉथ बीन; लॅ. विग्ना ॲकॉनिटिफोलिया; कुल – लेग्युमिनोजी; उपकुल – पॅपिलिऑनेटी). हे एक वर्षायू (जीवनक्रम एका हंगामात पूर्ण होणारे) व लागवडीतील कडधान्य आहे. याचा वेल किंवा झुडूप मूळचा भारतातील असून भारतात सर्वत्र (हिमालय ते कन्याकुमारीपर्यंत; वायव्य भारतात १,२०० मी. उंचीपर्यंत) आढळतो; रानटी अवस्थेत मात्र आढळत नाही. विग्नार या वंशात हल्लीमूग, उडीद, ॔ तूर,

चवळी यांचा समावेश केलेला असून त्यांच्याशी साम्य आढळल्याने आता त्या वंशात मटकीचाही समावेश करतात. ह्या वनस्पतीच्या खोडावर व फांद्यांवर बारीक केस तुरळकपणे असून पाने सोपपर्ण (तळाशी लहान उपांगे असलेली), संयुक्त व त्रिदली असतात; प्रत्येक दलाचे तीन ते पाच विभाग (दलके) असतात. उपपर्णे अरुंद व टोकदार असतात. खोडावर लहान पिवळ्या फुलांच्या मंजिऱ्या लांबट दांड्यावर येतात; शिंबा (शेंगा) लहान, गोलसर व २.५ – ६ सेंमी. लांब असून त्यांत ६ – १२, किंचित लांबट (४ द २ मिमी.) व पिंगट बिया असतात; प्रत्येक बीजात दोन जाड व लांबट दलिका असतात व पुष्क (गर्भाबाहेरील अन्नांश) नसतो. फुलाची संरचना साधारणपणे ॔ अगस्ता किंवा वाटाणा यांच्या फुलांप्रमाणे पतंगरूप असते; स्वपरागणाने (एकाच फुलातील पराग व स्त्री – केसराचा– किंजल्काचा – संपर्क होऊन) बीजोत्पादन होते. वनस्पतीची इतर सामान्य शारीरिक लक्षणे ॔ लेग्युमिनोजी कुलातील (शिंबावंत कुलातील) पॅपिलिऑनेटी उपकुलात वर्णन केल्याप्रमाणे असतात. बियांचा (विशेषतः बियांना मोड आणून त्यांचा) जेवणात वापर करतात; ते महत्त्वाचे अन्न आहे. मटकीत जलांश १०.८%, प्रथिने २३.६%, वसा (स्निग्ध पदार्थ) १.१%, तंतू ४.५% व इतर कार्बोहायड्रेटे ५३.५% आणि खनिजे १०० ग्रॅममध्ये ३.५ ग्रॅम आढळतात. तिच्यात कॅरोटीन, थायामीन, रिबोफ्लाविन, निॲकसीन आणि क ही जीवनसत्त्वे असतात. मोड आलेल्या बियांत क जीवनसत्त्व अधिक प्रमाणात असते. मूग, उडीद व मटकी यांच्या बिया तेलावर भाजून (तिखट – मिठासह) केलेल्या पदार्थास 'दाल मोठ' म्हणतात.

मटकीची मुळे मादक असतात; ज्वरात मटकी पथ्यकर आहे. मटकी वाजीकर (कामोत्तेजक), पित्तविकाररोधक, पाचक व हृदयास बल देणारी आहे. सुश्रुतसंहितेत मटकीचा उल्लेख 'वनमुग्द' या नावाने आला आहे.

हे पीक मुख्यत्वेकरून भारतातच कोरडवाहू पीक म्हणून लागवडीत आहे. भारतातील लागवडीखालील एकूण क्षेत्र निरनिराळ्या वर्षांत १७ ते २० हेक्टर असते. सर्वांत जास्त म्हणजे सु. १५ लक्ष हेक्टर क्षेत्र राजस्थानात आहे. त्या खालोखाल ते मध्य प्रदेश (मुगाखालील क्षेत्र धरून सु. २ लक्ष हेक्टर) आणि महाराष्ट्र (सु. १.३१ लक्ष हेक्टर) या राज्यांत आहे. गुजरात, जम्मू व काश्मीर, उत्तर प्रदेश, हरियाणा व कर्नाटक या राज्यांतही मटकीची थोड्याबहुत प्रमाणात लागवड होते.

इतर कडधान्यांपेक्षा हे पीक जास्त चिवट व दुष्काळी परिस्थितीला प्रतिकार करणारे आहे. याचे वेल जमिनीसरपट दाट वाढून जमीन झाकून टाकतात म्हणून या पिकाचा उपयोग जमिनीची धूप थांबविण्यासाठीही करतात. कधीकधी हिरवळीच्या खतासाठीही हे पीक पेरतात.

साधारणातः ५० ते ७५ सेंमी. वार्षिक पर्जन्यमानात हे पीक चांगले येते. फार पावसामुळे याचे नुकसान होते. हलकी व वाळुसरा जमीन ह्या पिकाला जास्त मानवते; परंतु हे खोल काळ्या अथवा मळीच्या जमिनीतही येऊ शकते.

हे पावसाळी हंगामातील पीक असून त्याची पेरणी जून – जुलै महिन्यात आधी तयार केलेल्या जमिनीत करतात. हे स्वतंत्र पीक म्हणून अथवा ज्वारी, बाजरी यांसारख्या पिकांत मिश्र पीक म्हणून घेतात. स्वतंत्र पिकासाठी हेक्टरी १० – १५ किग्रॅ. बी लागते व ते हाताने फोकून अथवा ओळीत पेरतात. मिश्र पिकासाठी २ ते १० किग्रॅ. बी लागते व ते मुख्य पिकाच्या बियांत मिसळून पेरतात किंवा मोघणीमधून मुख्य पिकात स्वतंत्र ओळीत पेरतात. व्यापारात याचे (१) काळी मटकी (काळी मुंगी) व पांढरट हिरवी मटकी (गोरा) असे दोन प्रकार मानले जातात. दुसरा प्रकार अधिक प्रमाणात प्रचलित असून काळा प्रकार कमी प्रमाणात (बहुशः हरियाणात व गुजरातमध्ये) लागवडीत आहे. या पिकाचे सुधारित प्रकार अद्याप फारसे उपलब्ध नाहीत.

पेरणीपासून साधारणतः तीन आठवड्यांनी पहिली व पुढे दोन आठवड्यांनी दुसरी कोळपणी करतात. रासायनिक खते सहसा दिली जात नाहीत; परंतु फॉस्फरसयुक्त खत दिल्याने इतर कडधान्यांप्रमाणे मुळांवरील गाठींची वाढ होऊन जमीन सुधारते व पीकही चांगले येते.

ऑक्टोबरअखेर अथवा नोव्हेंबर महिन्यात हे पीक कापणीस तयार होते. शेंगा वाळल्यावर वेल कापून अगर उपटून इतर कडधान्यांप्रमाणे मळणी करतात. हेक्टरी सु. ५०० किग्रॅ. दाणे आणि सु. १,००० किग्रॅ. भुसा मिळतो.

या पिकाचे रोग व किडींपासून विशेष नुकसान होत नाही. केव्हा केव्हा पानावरील अळ्या कोवळी पाने व शेंगा खातात. उपद्रव सुरू होताच १०% बीएचसी भुकटी हेक्टरी २५ – ३० किग्रॅ. या प्रमाणात पिकावर पिस्कारतात.

ओल्या शेंगातील अथवा वाळलेले दाणे तळून अथवा उसळ करून खातात. पिठाचा उपयोग खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी करतात. कामाच्या जनावरांना भुसकट खाऊ घालतात; परंतु दुभत्या जनावरांना खाऊ घातल्याने दूध कमी येते, असे मानले जाते.

## हरभरा लागवड



**कोरडवाहू क्षेत्रामध्ये हरभरा हे रबी हंगामातील महत्त्वाचे पीक आहे. महाराष्ट्रातील प्रमुख कडधान्य पिकांपैकी पश्चिम महाराष्ट्रामध्ये हरभरा या पिकाखाली ३.०१ लाख हेक्टर क्षेत्र तर उत्पादन २.५१ लाख टन होते. हे राज्याच्या या पिकाखालील क्षेत्र च्या सुमारे २७ टक्के इतके आहे.**

### जमीन
पिकासाठी मध्यम ते काळी कसदार व चांगल्या निच-याची जमीन निवडावी, हलक्या अथवा भरड, पाणथळ, चोपण किंवा क्षारयुक्त जमीन हरभ-यासाठी निवडू नये. जमिनीचा सामू ५.५ ते ८.६ असावा.

### पूर्वमशागत
खरीपाचे पीक निघाल्यानंतर खोल नांगरट करावी. कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. काडीकचरा वेचून जमीन स्वच्छ करावी. खरीपामध्ये शेणखत दिले नसल्यास हेक्टरी पाच टन चांगले कुजलेले शेणखत जमीनीमध्ये मिसळावे. या प्रमाणे सप्टेंबरच्या अखेरीस पेरणीसाठी शेत तयार ठेवावे.

### आंतरमशागत
पिकाच्या जोमदार वाढीसाठी शेत सुरुवातीपासून तण विरहीत ठेवावे. पीक २० दिवसांचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी आणि एक महिन्याचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी शक्यतो वापशावर करावी. कोळपणीनंतर एक खुरपणी करावी. उगवणीपूर्वी तणनाशकाचा वापर करायचा असल्यास पेंडिमिथीलीन ५ लीटर (स्टॉम्प ३० इ.सी) किंवा अँलाक्लोर (लासो ५० इ.सी) ३ लीटर एक हेक्टर क्षेत्राकरिता ५०० लीटर पाण्यामध्ये मिसळून अंकूर जमिनीच्या पृष्ठभागावर येण्याआधी फवारावे.

### पेरणीची वेळ
हरभरा हे रबी हंगामाचे पीक असल्याने कोरडी व थंड हवा त्याला चांगली मानवते. कोरडवाहू क्षेत्रामध्ये २५ सप्टेंबरनंतर जमिनीची ओल उडून जाण्यापूर्वी पेरणी करावी. यासाठी प्रामुख्याने विजय हा वाण वापरावा. बागायती हरभरा २० ऑक्टोंबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान पेरल्यास चांगले उत्पादन येते.

### बीजप्रक्रिया
पेरणीपुर्वी प्रतिकिलो बियाण्यास २ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बावीस्टीन किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा आणि २५ ग्रॅम रायझोबियम आणि पी.एस.बी गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून चोळावे.

### पीक सरंक्षण
हरभरा पिकाचे घाटेअळीमुळे ३० ते ४० टक्के नुकसान होते. पीक ३ आठवड्याचे झाले असता त्यावर बारीक अळ्या दिसू लागतात. पानांवरती पांढरे डाग दिसतात आणि शेंडे खाल्लेले असतात. याबेळी लिंबोळीच्या ५ टक्के द्रावणाची एक फवारणी घ्यावी. त्यामुळे अळीची भूक मंदावते. आणि त्या मरतात. पुढे १० ते १५ दिवसांनी हेलिओकिल ५०० मिली प्रति हेक्टर या विषाणूजन्य किटकनाशकाची फवारणी करावी. या किडीचे नियंत्रण एकात्मिक पद्धतीने चांगले होते. त्यासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २०० ग्रॅम ज्वारी, १०० ग्रॅम मोहरी आणि २ किलो धने शेतामध्ये पेरावे. या पिकांच्या मित्रकिडीच्या आकर्षणासाठी उपयोग होतो त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण होते. पक्षांना बसायला जागोजागी तु-याटयाची मचाणे लावावीत. त्यावर कोळसा, चिमण्या, सांळुक्या असे पक्षी येतात आणि अळ्या वेचतात. हेक्टरी ५ फेरोमेनचे सापळे लावावेत.

### पाणी व्यवस्थापन
हरभरा पीक पाण्यास अतिशय संवेदनशील असे पीक आहे. हरभरा पिकाला साधारणपणे २५ सेमी पाणी लागते. पेरणी झाल्यानंतर एक हलके पाणी द्यावे. त्यामुळे उगवण चांगली होते. मध्यम जमिनीमध्ये सुमारे २५ ते ३० दिवसांनी द्यावे. ४५ ते ५० दिवसांनी दुसरे पाणी आणि आवश्यकता वाटल्यास तिसरे पाणी ६५-७० दिवसांनी द्यावे. जमिनीच्या मगदुरानुसार आणि आवश्यकतेनुसार पाणी द्यावे.

### काढणी
१०० ते ११० दिवसांमध्ये पीक चांगले तयार होते. पीक ओलसर असताना काढणी करु नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभ-याची काढणी करुन मळणी करावी. यानंतर धान्यास ५-६ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडुलिंबाचा पाला (५ टक्के) घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही.

### उत्पादन
अशाप्रकारे हरभ-याची शेती केल्यास सरासरी २५ ते ३० क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळू शकते..

### खतमात्रा
हरभ-याला हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरदाची आवश्यकता असते. घाटे भरण्याच्या अवस्थेमध्ये २ टक्के युरीयाची फवारणी करावी.

**हरभरा सरी वरब्यावंरही चांगला येतो. भारी जमिनीत ९० सेंमी रुदींच्या स-या सोडाव्यात आणि वरब्यांच्या दोन्ही बाजूला १० सेमी अंतरावर १ ते २ दाणे टोकावे.**

## अननसाची लागवड



अननस लागवडीसाठी क्यू, क्वीन या बिगरकाट्याच्या जाती आहेत. फळे साधारणतः १.५ ते २.५ किलो वजनाची असतात. या जातीच्या फळांवरील डोळे खोलवर गेलेले नसतात. या जाती प्रक्रिया उद्योगासाठी चांगल्या असून, व्यापारीदृष्ट्या लागवडीसाठी योग्य आहेत. याचबरोबरीने जायंट क्यू, मॉरिशिअस या जातीसुद्धा लागवडीसाठी वापरल्या जातात.लागवड करताना जमीन चांगली नांगरून, कुळवून ३० ते ४० सें.मी. खोल भुसभुशीत करावी. हेक्टरी २० टन शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. या पिकाची लागवड ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात चरात केली जाते. त्यासाठी ३० सें.मी. खोलीचे, तीन ते चार मीटर लांब चर तयार करावेत. दोन चरांतील अंतर ९० सें.मी. ठेवावे. चरातील दोन रांगांतील अंतर ६० सें.मी. ठेवावे. दोन झाडांतील अंतर १५ सें.मी. ठेवावे. विरळ लागवडीमध्ये ३० ते ४५ सें.मी.पर्यंत ठेवावे. लागवड जवळ केल्यास लहान आकाराची फळे मिळतात. लागवड करताना झाडाच्या आतील पोंग्यांत माती जाणार नाही याची काळजी घ्यावी. हे पीक बागायती असल्याने कोकणपट्टीत नारळाच्या बागेत लागवड करता येते. अननसाची लागवड फुटवे, फळाचा मूळ दांडा व पाने यामध्ये वाढणारा फळाखालील कोंब आणि फळावरील शेंडे यापासून करतात. फुटवे वापरून लागवड केल्यास १८ ते २२ महिन्यांत फळे तयार होतात. फळाखालील कोंब व फळावरील पानाच्या शेंड्याचा वापर लागवडीसाठी केल्यास फळे अनुक्रमे २२ ते २४ महिन्यांत तयार होतात. लागवड करताना रोपे बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून लावावीत. अति पावसात लागवड करू नये.प्रत्येक रोपाला १२ ग्रॅम नत्र, सहा ग्रॅम स्फुरद, १२ ग्रॅम पालाश या प्रमाणात दोन ते तीन हप्त्यांत खते द्यावीत. पहिला हप्ता लागवडीनंतर तीन महिन्यांनी द्यावा व शेवटचा हप्ता एक वर्षाच्या आत द्यावा. हिवाळ्यात आठ ते दहा दिवसांनी व उन्हाळ्यात सहा दिवसांनी जमिनीच्या मगदुरानुसार पाणीपुरवठा करावा. पावसाळ्यात चरात पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी. पिकाला अधूनमधून भर द्यावी. खतांचा हप्ता दिल्यानंतर लगेच भर देणे गरजेचे आहे. चरामध्ये वाळलेल्या गवताचे आच्छादन करावे. एप्रिल-मे महिन्यात फळे काढणीस येतात. अननसाचे खोडवा पीक घेता येते. मुख्य पीक तयार होण्यासाठी २० ते २४ महिन्यांचा कालावधी लागतो, तर खोडवा पीक तयार होण्यासाठी १२ महिन्यांचा कालावधी लागतो. खोडव्याचे उत्पादन मुख्य पिकाच्या निम्मे येते. फळांच्या काढणीनंतर एक जोमदार फुटवा ठेवून बाकीचे फुटवे व मूळ झाड काढून टाकावे. खोडवा पिकास शिफारशीप्रमाणे खते द्यावीत. फळे पूर्ण तयार झाल्यावर, फळाच्या खालचे एक व दोन ओळींतील डोळे पिवळे झाल्यानंतर फळे दांड्यासह कापून काढावीत. फळाला इजा करू नये.

## शॉर्ट न्यूज

### शेततळ्यात बुडून तरुणाचा मृत्यू

■ **संगमनेर :** तालुक्यतील मिर्झापूर येथील स्वरूप वसंत वलवे (वय १७) तरुणाचा शेततळ्यातील पाण्यात पडून मृत्यू झाला आहे. ही घटना सायंकाळी साडेपाच वाजेपूर्वी घडली. मिर्झापूर येथे वसंत वलवे हे शेतकरी राहतात. मंगळवारी सायंकाळी त्यांचा मुलगा स्वरूप हा घरापासून जवळच असलेल्या शेततळ्याजवळ गेला होता. त्याच दरम्यान पाणी पाहत असताना त्याचा पाय घसरल्याने शेततळ्यात पडून मृत्यू झाला आहे. त्यानंतर शेततळ्यातून मृतदेह बाहेर काढण्यात आला. याप्रकरणी कैलास वलवे यांनी दिलेल्या खबरीवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद झाली.

### श्रीरामपूरात ५ कोटींची फसवणूक

■ **श्रीरामपूर :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास महिन्याला १० ते १५ लाख रूपये नफा मिळेल, असे आमिष दाखवत ५ कोटी रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील चौघाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मुश्ताक बनेमियाँ शेख (रा. डावखर रोड, श्रीरामपूर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून शहरातील वॉर्ड नंबर २ मधील राहिवासी आदिल बहोद्दिन जहागिरदार, त्याची पत्नी, भाऊ - इमान बहोद्दीन जहागिरदार व वडील- बहोद्दीन जहागिरदार यांच्याविरूद्ध येथील शहर पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी अनिल सांगळे

■ **कोपरगाव :** भारतीय जनता पार्टीचेः प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहमतीने व आदेशाने अहमदनगर उत्तर भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गाडेकर यांनी नुकतीच उत्तर नगर जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाची जिल्हा कार्यकारणी जाहीर केली असून यात कोपरगाव तालुक्यातील सोनारी येथील अनिल धोंडीबा सांगळे यांची जिल्हा कार्यकारणीवर सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### आयुष्यमान भारत कार्ड वाटपे

■ **शेवगाव :** येथे सायली प्रतिष्ठाणच्या व वतीने आयुष्यमान भारत जन आरोग्य शिबिर घेऊन नागरिकांची आयुष्यमान कार्ड ची नोंदनी करून आयुष्यमान कार्ड मोफत वाटप करण्यात आले. आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना कार्ड वाटप उद्घाटन समयी अरुण पाटील लांडे, प्रविण भाऊ भारस्कर, ताहेर पटेल वहाबभाई, राजुभाई, चंदभाई, शैलेंद्र भारस्कर, रोहन साबळे, प्रवीण सकट, आबेद शेख, शाहू फुले आंबेडकर साठे कलाम सामाजिक विचार मंच संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे सर, योव्हान रोकडे, पोपट भारस्कर, जॉन बर्वे, संदिप भारस्कर, विठ्ठल मोहिते आदी उपस्थित होते.

### विसापूर प्रकल्पात पाणी सोडण्याचे आदेश

■ **श्रीगोंदा :** कुकडी प्रकल्पाचे मागील १५ डिसेंबर पासून आवर्तन सुरु आहे. कुकडीतून विसापूर प्रकल्पातही २१ जानेवारीपासून पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती खासदार डॉ. सुजय विखे यांनी दिली. याप्रश्नी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार बबनराव पाचपुते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे विसापूर धरणार पाणी सोडण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्याने विखे पाटील आणि आमदार पाचपुते यांची शिष्टाई कामी आल्याची माहिती दिली.

# राहुरीत पोलीस निरीक्षक ठेंगेंसमोर गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान

## वाढत्या गुन्हेगारीला आळा बसणार का ?

राहुरी : श्रीकांत जाधव



**राहुरी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी संजय ठेंगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्वात मोठं मानवी तस्करीच रॅकेट अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी उघडकीस करून २१ वेठबिगारी व भीक मागणांऱ्याची सुटका केली होती.त्यांच्या या कार्याचा राज्यात सर्वत्र गौरव करण्यात आला होता. राहुरीत वाढलेली गुन्हेगारी आळा घालण्यास पोलीस निरीक्षक ठेंगे कसे यशस्वी ठरणार हे येत्या काळात पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**

जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी नगर जिल्ह्यातील पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश काढले यामध्ये जिल्ह्यातील अनेक पोलिसांची खांदेपालट केली तर जिल्हाबाहेरून आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनाही पोलीस ठाणे दिले आहेत.

५ वर्षात डझनभर पोलीस निरीक्षक बदलून गेलेल्या राहुरी पोलीस ठाण्यात तात्पुरता चार्ज असलेले संजय सोनवणे यांची बदली होऊन त्यांना आश्वी पोलीस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली. तर बेलवंडीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना राहुरी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती केली आहे. नवीन आलेले पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचा बेलवंडीचा कारभार चांगल्या कामामुळे नेहमी चर्चेत राहिला आहे. मानवी तस्करीचे सर्वात मोठं रॅकेट उघडकीस केल्यामुळे त्यांचा सर्वत्र गवगवा झाला होता. स्नेहालय संस्था, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचा गौरव केला.आता राहुरीत वाढलेली गुन्हेगारी, पोलीस कर्मचाऱ्यात सुसूत्रता आणण्यास ते यशस्वी ठरणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**काय होती मानवी तस्करी**

बेलवंडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ४८ गावं आहेत. पोलिसांना ३० नोव्हेंबर २०२२ ला सुरेगाव शिवारात एका पोत्यात बेवारस व्यक्तीचा मृतदेह सापडला होता. तर ढवळगाव इथे २०२३ च्या मे महिन्यात एका विहिरीत अनोळखी अपंग व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. नंतर २०२३ च्या सप्टेंबरमध्येही अशीच घटना घडली. वर्षभर पोलीस या गूढ मृत्यूंचा तपास करत होते. संशयितांच्या चौकशीतून आणि पुरावे हातात आल्यानंतर पोलिसांनी अखेर डिसेंबर २०२३ महिन्यात आरोपींच्या मुसक्या आवळल्या. १८ डिसेंबरला छापे टाकून आरोपींना अटक केली. २०११ पासून या भागात ७१ अनोळखी व्यक्तींचे मृतदेह सापडले. या भागात एकही औद्योगिक वसाहत नाही, त्यामुळे कामासाठी बाहेरुन येणाऱ्यांची संख्या इतकी कशी याबद्दल संशय बळावत होता.

काही स्थानिकांच्या टोळ्या काही माणसांना डांबून ठेऊन त्यांच्याकडून घरची तसंच शेतीची काम करुन घेतात. अनेकदा त्यांना मारहाणही केली जाते. इतकंच नाही तर या लोकांना वेगवेगळ्या रेल्वे स्टेशन्सवर भीक मागण्यासाठी पाठवलं जातं. अशा व्यक्तींचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे मृतदेह पाण्यात किंवा गोणीत भरुन टाकून देतात.' याच संदर्भात अशा गुलाम केलेल्या काही जणांना विटभट्ट्यांवर आणि शेतात कामावर ठेवायचे अशा जवळपास २१ पेक्षा जास्त वेठबिगारी व भीक मागणांऱ्याची सुटका पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी करून मानवी तस्करीच रॅकेट उघडकीस केले होते.

**गांजा तस्करी, वेश्या व्यवसाय फर्दाफाश**

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी बेलवंडी पोलीस ठाणे हद्दीतील गांजा तस्करी, अवैध वेश्या व्यवसायाचा फर्दाफाश केला होता.

**आयजींकडून गौरव**

बेलवंडी पोलिस ठाण्याचा कारभार बघत असताना पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी १ मार्च २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत बेलवंडी पोलीस स्टेशन कडील मालमत्तेविरुद्ध ६१ गुन्ह्यांपैकी ३१ गुन्हे उघडकीस व ६८ आरोपी अटक करून गुन्हयातील चोरीस गेलेला १३,५६,०००/- रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.या कामगिरी मुळे पोलीस महानिरीक्षक बी. जे. शेखर यांचे हस्ते पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी विवेकानंद वाखारे यांचे प्रमुख उपस्थितीत बेलवंडी पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे कौतुक करून उत्कृष्ट प्रभारी अधिकारी म्हणून गौरव करण्यात आला होता.

**चाळीसगावातही दमदार कामगिरी**

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे चाळीसगाव येथे पोलीस निरीक्षक पदावर असताना अनेक गुन्हेगारी वृत्तीचा त्यांनी बिमोड करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली होती.

# रामानंद सागर यांच्या रामायणाची आठवण !

■ आयोध्येतील श्री राम मंदीर लोकार्पणाचे निमित्त
■ राममय वातावरणात जुन्या लोकांचा आठवणींना उजाळा

शिरुर : सतीश डोंगरे



**सन १९८० च्या दशकातील तो काळ, रेल्वे गाड्या स्टेशनमध्ये थांबायच्या, बसेस थांबायच्या आणि प्रवासी उतरून रस्त्यालगत मिळेल तिथे टीव्ही गाठून रामायण पाहायचे. ही गर्दी इतकी मोठी असायची की अनेकांना तो टीव्ही दिसायचा ही नाही, ना काही ऐकू यायचं. पण जवळपास संपूर्ण देश बंद होत असे, रस्त्यांवर सामसूम व्हायची, दुकानं बंद व्हायची, लोक लवकर आवराआवरी करुन आंघोळ करून टीव्ही पुढे ही मालिका पाहायला बसायचे...**

आयोध्येत भगवान श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होत आहे. आयोध्येसह संपूर्ण भारतभर प्राणप्रतिष्ठा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा प्राणप्रतिष्ठा सोहळा अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला असून संपूर्ण देशभरात श्रीराम जन्मभूमी न्यासातर्फे संपूर्ण विविध उपक्रम, अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे सध्या सर्वत्र राममय वातावरण निर्मिती झाली आहे.

त्यातून अनेकांना यानिमित्ताने १९८० च्या दशकातील रामानंद सागर यांच्या टीव्ही वरील रामायण मालिकेची आठवण झाली.

१९८७ ते १९८८ या काळात दूरदर्शनवर रामायण या मालिकेचं प्रसारण झालं. अरुण गोविल (श्रीराम), दीपिका चिखलिया (सीता), दारा सिंग (हनुमान), सुनील लाहिरी (लक्ष्मण) आणि अरविंद त्रिवेदी (रावण) यांच्या या मालिकेत प्रमुख भूमिका होत्या. भारताच्या टीव्ही इतिहासातली सगळ्यात यशस्वी मालिका म्हणून 'रामायण' कडे पाहीले जात आहे. ७८ भागांमध्ये चाललेली ही मालिका दर रविवारी सकाळी प्रसारित व्हायची. लोक आठवडाभर या एका दिवसाची वाट पहायचे. यातले काही लोकप्रिय भाग जवळपास ८ कोटी ते १० कोटी लोकांनी पाहिले होते. हा आकडा भारताच्या तेव्हाच्या लोकसंख्येच्या एक अष्टमांश इतका होता.

त्या काळात लोकांमध्ये रामायणाची इतकी क्रेझ होती की रेल्वे गाड्या स्टेशनमध्ये थांबायच्या, बसेस थांबायच्या आणि प्रवासी उतरून रस्त्यालगत मिळेल तिथे टीव्ही गाठून रामायण पाहायचे. ही गर्दी इतकी मोठी असायची की अनेकांना तो टीव्ही दिसायचाही नाही, ना काही ऐकू यायचं. पण लोकांचा उत्साह तसूभरही कमी होत नसे. अनेक लोक आंघोळ करून, टीव्हीला हार घालून मग ही मालिका पाहायला बसायचे.

सगळ्या देशाला त्यावेळी 'रामायण ज्वर' चढला होता. रामायणामध्ये रामाची भुमिका करणारे अरूण गोविल कुठेही गेले तरी लोक आदराने त्यांच्या पाया पडायचे, त्यांना स्पर्श करू पाहायचे. लोकांना या भूमिकेबद्दल प्रचंड कौतुक आणि आदर होता, त्यांना पाहिल्यानंतर अनेकांना आनंदाने रडू कोसळायचं.एकूणच जनमानसातून या मालिकेला मिळणारा प्रतिसाद हा भक्तीभावाचा होता. आता आयोध्येतील श्री राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने जुन्या लोकांना पुन्हा रामायण मालिकेचा काळ आठवला अन् अनेकजण जुन्या आठवणीत हरवून गेले.

# ट्विटरप्रमाणे ठाकरेंची चिमणी उडून जाणार

■ ठाकरेंना पंतप्रधान पदाची स्वप्न ■ भाजप नेते प्रसाद लाड यांचा हल्लाबोल

मुंबई : प्रतिनिधी



**उद्धव ठाकरेंना आता पंतप्रधान पदाची स्वप्न पडू लागली आहेत. ट्विटरची जशी चिमणी उडाली तशीच ठाकरेंच्या स्वप्नांचीही चिमणी उडून जाईल, असे म्हणत भाजप नेते प्रसाद लाड यांनी ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला.**

**ठाकरेंना पंतप्रधान पदाची स्वप्न**

२०१३ चा दाखला देत उद्धव ठाकरे म्हणाले माझं पद अवैध्य होतं, तर अमित शाह मातोश्रीवर का आले होते? असा सवालही करत त्यांनी इशाराही दिला होता. या वक्तव्यानंतर भाजप नेते प्रसाद लाड यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर भाष्य केले. प्रसाद लाड म्हणाले- उद्धव ठाकरेंना पंतप्रधान होण्याची स्वप्न पडू लागली आहेत. मात्र त्यांच्या या स्वप्नांची चिमणी एक दिवस उडून जाईल. जशी ट्विटरची चिमणी उडाली, त्याचप्रमाणे त्यांच्या स्वप्नांची चिमणीही भुर्रर उडून जाईल.

ठाकरे शहांवर बोलण्याइतके मोठे नाही यावर भाजप आमदार प्रसाद लाड यांनी भाष्य करत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. अमित शहांवर बोलण्याइतके उद्धव ठाकरे मोठे झालेले नाहीयेत, त्यांना आता पंतप्रधान पदाची स्वप्न पडू लागलेली आहेत. ट्विटरची जशी चिमणी उडाली आहे तशीच यांच्या स्वप्नांची चिमणी उडेल असे म्हणत प्रसाद लाड यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार घणाघात केला.

**ठाकरेंची दशा बदलली**

त्याचबरोबर लाड यांनी उद्धव ठाकरेंच्या काल घेतलेल्या महापत्रकार परिषदेवरही हल्ला चढवला. ते म्हणाले- महापत्रकार परिषद पाहता, ठाकरेंनी दिशा बदललेली दिसत आहे, तसेच त्यांची दशादेखील बदलली आहे. तर ही पत्रकार परिषद होती की वरळी विधानसभेचा मेळावा होता? हा सवाल प्रसाद लाड यांनी उपस्थित करत ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

सुप्रीम कोर्टावर ठाकरेंचा विश्वास नाही

राहुल नार्वेकरांच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे गटाकडे काहीच पदे शिल्लक राहिलेली नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून न्यायालयावर आणि नार्वेकरांच्या निर्णयावर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. ठाकरे गटाचा आता सुप्रीम कोर्टावरही विश्वास राहिलेला नाही. त्याचं मानसिक संतुलन बिघडलं असून ही विनाशकारी विपरित बुद्धी असल्याचे प्रसाद लाड म्हणाले आहेत.

## वाचकांच्या लेखणीतून

# मान कर्तृत्वाचा सन्मान आदर्श नेतृत्वाचा

अहमदनगर येथील स्पर्श सेवाभावी संस्थेतर्फे दिला जाणारा आदर्श शाळा राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ देवीभोयरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेस जाहीर झाला आहे.

समाजाला समर्पित असणाऱ्या शिक्षण, कला, राजकीय, वैद्यकीय, कृषी आदी क्षेत्रांतील समाजाभिमुख नामवंत आणि गुणवंत संस्थांचा आणि नेतृत्वाचा पुरस्कार देऊन सन्मान करणे हा स्पर्श सेवाभावी संस्था, अहमदनगर यांचा स्तुत्य उपक्रम आहे. मान कर्तृत्वाचा सन्मान आदर्श नेतृत्वाचा ही टॅग लाईन घेऊन ही संस्था कार्यरत आहे.



**एक क़दम जाना जिधर दुश्वार था।**
**शौक़ लेकर सैंकड़ों मंज़िल गया।।**

एक पाऊल जाणे जिथे कठीण होते तेथे उत्साह आम्हाला शेकडो पायऱ्या चढून जाण्यासाठी उपकारक ठरला. असा सैयद ज़ामिन अली जलाल यांचा उर्दू शेर आहे. अहमदनगर येथील सेवाभावी संस्थेने समाजातील कर्तृत्ववान संस्था आणि आदर्श नेतृत्वाचा गौरव करून त्यांना प्रोत्साहित करणे हेही नसे थोडके, असेच म्हणावे लागेल.

दीप्यते दीपयति वा स्वं परं चेति (स्वतः प्रकाशित होणारा किंवा दुसऱ्याला प्रकाशित करणाऱ्याला दीप म्हणतात) असे शब्दकल्पद्रुम या संस्कृत ग्रंथात म्हटले आहे. याच दीपाचे कार्य करणाऱ्या अहमदनगर येथील सेवाभावी संस्थेचेही कौतुकच केले पाहिजे.

हा पुरस्कार वितरण सोहळा अहमदनगर येथे पार पडणार आहे. २० जानेवारी २०२४ रोजी हा आदर्श शाळा पुरस्कार देवीभोयरे येथील जि.प. प्राथमिक केंद्र शाळेतर्फे मुख्याध्यापिका जिजाबाई गणपत बनकर स्वीकारणार आहेत.

हा पुरस्कार आमच्या शाळेला जाहीर झाल्याबद्दल मला आणि माझ्या सहकारीवृंदाला आनंद झाला आहे. हा आमचा नसून आमच्या शाळेचा सन्मान आहे. अशी प्रतिक्रिया शाळेच्या मुख्याध्यापिका जिजाबाई गणपत बनकर यांनी व्यक्त केली.

हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल देवीभोयरे येथील जि.प. प्राथमिक केंद्र शाळेचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

**नाना ढवळे**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

# गाडीत कोण बसले... किती बसले... अरे !

गटाच्या महिला विभागातर्फे मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात भव्य नारीशक्ती निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला अजित पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महाराष्ट्र दौरा, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचा दाटीवाटीच्या प्रवासाचा व्हायरल व्हिडीओ, नारीशक्ती निर्धार मेळावा अशा विविध विषयांवर अजित पवार यांनी भाष्य केले.

पंतप्रधानांच्या दौऱ्यामध्ये कोण कुणाच्या गाडीत बसणार, कुठे बसणार हे चेक होत असतं. पुढे गाडीचा चालक आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर मागे मी स्वत: होते, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे बसणार होतो. पण ताफा एकदम पुढे गेल्याने आमचे मंत्रिमंडळातील सहकारी गिरीश महाजन यांना बसायला गाडी नसल्याने मीच त्यांना म्हटलं आपण दाटीवाटीने जाऊ. शेवटी आम्ही काही रुबाब दाखवणारी माणसं नाही. एकमेकांना सांभाळून, एकमेकांना सोबत घेऊन जाणारी माणसं आहोत, अशी सारवासारव अजित पवार यांनी व्हायरल व्हिडीओवर बोलताना केली.

जे व्हिडीओ व्हायरल करतायेत, त्यांची मला कीव करावीशी वाटते. विकासाचं बोलुयात ना आपण... गाडीत किती बसले, कोण बसले... अरे दाटीवाटीचा त्रास जे गाडीत बसले त्यांना होईल ना... तुम्हाला त्रास व्हायचं काय कारण आहे? असा प्रश्न अजित पवार यांनी संतापून विरोधकांना विचारला.

नको त्या विषयांवर बोलण्यात अर्थ नाही. त्यामुळे अधिक स्पष्टीकरण देण्याची गरज वाटत नाही. पण गाडीत जागा असताना देखील तिसऱ्या व्यक्तीला आम्ही गाडीत घेत नाही. तो दार उघडा म्हणतोय पण आम्ही दार उघडत नाही, असं जर झालं असतं तर नक्की बोलण्याचा अधिकार होता. परंतु असं काहीही झालं नाही. विरोधकांनी उगीच कोणताही विषय मोठा करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

## आमदार अपात्रतेचा निर्णय आश्चर्यजनक असेल !

मुद्दा पवार साहेबांबद्दल बोलतात त्याला पाठबळ देण्याचे भाजप काम करत असताना दुसरीकडे अशा ऑफर दिल्या जात असल्याचे रोहित पवार म्हणाले.

पूर्वी काही नेत्यांचा रुबाब आपण पाहत होतो, मात्र काही नेत्यांचा एक व्हिडिओ व्हायरल होतोय, त्यात चार मोठे नेते मागील सीटवर दाटीवाटीने बसताना दिसत आहेत, अशी टीका आ. रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर केली. दिल्लीमध्ये चर्चा नव्हे तर आदेश दिले जातात आणि त्यामुळे कुठेतरी कुणाला सहा जागा, कोणाला आठ जागा दिल्या जाण्याची चर्चा आहे आणि राहिलेल्या जागा हे भाजप लढवेल असे चित्र दिसत असल्याचं रोहित पवार म्हणाले. भाजपमध्ये हुकूमशाही तर आमच्या राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेसमधे लोकशाही असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने महाजनता पत्रकार परिषद घेण्यात आली त्यावर भाष्य करताना रोहित पवार म्हणाले की, काल एकंदरीत उद्धव ठाकरे कमी बोलले मात्र दुसरीकडे शिवसेनेचे वकील आणि तज्ञ मंडळी यांनी एकूणच सर्व खटला सविस्तरपणे जनतेसमोर मांडला आहे. त्याचबरोबर शिवसेना सोडून गेलेल्या अनेक नेत्यांचे फोटो काल दाखवण्यात आले, ज्यात हेच सोडून गेलेले नेते पक्षप्रमुखांचे पाय धरताना दिसत आहेत. त्यामुळे लगेच विधान परिषदेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्रकार परिषद घ्यावी लागली. यामुळे त्यांना कुठेतरी कुणाचा आदेश पाळावा लागतोय काय असे दिसून येत असल्याची टीका रोहित पवार यांनी केली.

# भाळवणीत ८ कोटींच्या कामांचे भुमिपूजन, लोकार्पण

## खा. डॉ. सुजय विखे यांची उपस्थिती

**भाळवणी : प्रतिनिधी**

**भाळवणी येथील ८ कोटी १४ लक्ष रूपये खर्चाच्या विविध विकास कामांचे शुक्रवार दि.१९ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता भुमिपूजन व लोकार्पण खा. डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख तथा पंचायत समितीचे माजी सदस्य विकास रोहोकले यांनी दिली.**

२ कोटी रूपये खर्चाची जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजना, ७५ लाख रूपये खर्चाचे जि. प. शाळा खोल्या बांधकाम, मुख्य चौक सुशोभिकरण ४६ लाख, नारायणनगर ते आमली रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण ३० लाख, भाळवणी ते चेमटे मळा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण १५ लाख, भांडगांव रस्ता ते डोंगरवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण १५ लाख, लकडे



मळा ते लोंढेमळा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण १५ लाख,

नागबेंदवाडी ते खारवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण २५ लाख, माळवाडी ते वडगांव आमली रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण २५ लाख, माळवाडी नारायणनगर ते आमले वस्ती रस्ता २५ लाख, एनएच २२२ ते फार्म रस्ता २५ लाख, लोंढे मळा ते भुजबळ वस्ती शेत पानंद रस्ता २५ लाख, खारवाडी ते वैराळवस्ती शेत पानंद रस्ता २५ लाख, नागेश्वर मंदिर ते चेमटे मळा रस्ता शिवपानंद रस्ता २५ लाख, भाळवणी ते पिराचा मळा शेतपानंद रस्ता २५ लाख, नागबेंदवाडी ते दळवी वस्ती शेत पानंद रस्ता २५ लाख, नागबेंदवाडी ते येवले वस्ती शेत पानंद रस्ता २५ लाख, सब स्टेशन ते चेमटे मळा शेत पानंद रस्ता २५ लाख, पांदडवाडी ते खारवस्ती शेत पानंद रस्ता २५ लाख, भाळवणी ते निमगांव घाणा शेतपानंद रस्ता २५ लाख, भाळवणी ते कपाळे मळा शेत पानंद रस्ता २५ लाख, जन सुविधा अंतर्गत माळवाडी येथे भुमिगत गटार योजना १० लाख, भाळवणी येथे भुमिगत पाण्याची टाकी बांधणे २० लाख, भुजबळनगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण व पेव्हर ब्लॉक बसविणे ३० लाख. या कामांचे भुमिपूजन व लोकार्पण करण्यात येणार आहे.

# गालफुगी साथीवर वेळीच उपचार घेण्याची गरज

## डॉ.सुनिल कदम यांचे आवाहन

**निघोज : प्रतिनिधी**



**गालफुगी (गालगुंड) ची साथ सध्या राज्यात पसरली आहे.५ ते १५ वयोगटातील बरीच मुलं ह्या आजाराने ग्रासलेली दिसून येत आहेत.प्रौढांमध्ये या आजाराचं प्रमाण तुलनेने कमी आहे.यासाठी गालफुगी साथीवर वेळीच उपचार घेण्याची गरज असल्याचे आवाहन निघोज येथील वात्सल्य हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ सुनिल कदम यांनी केले आहे.**

अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की,गालगुंड हा विषाणूजन्य आजार आहे.तो पॅरामिक्झो ह्या विषाणू पासून होतो. त्याचा प्रादुर्भाव हिवाळ्यात वाढतो.या आजारात लाळ ग्रंथी (पॅरोटीड) सुजतात.हा विषाणू संसर्गजन्य आहे आणि त्याचा प्रसार खोकला,शिंक आणि लाळे वाटे होतो.प्रमुख लक्षणे ताप, गाल सुजणे,मुलींमध्ये ओटीपोटात दुखू शकते. आजाराचा कालावधी साधारण २ आठवड्यात लक्षणे कमी होतात आणि रुग्ण बरा होतो.तसा हा आजार सहजासहजी बरा होतो पण क्वचित ह्या आजारापासून काही इतर गंभीर आजार उद्भवतात.

### उपचार व काळजी

**या आजारावर विशिष्ठ असा उपचार नाही. रुग्णाच्या लक्षणानुसार औषधे दिली जातात.संसर्ग झालेल्या मुलांनी शाळेत आणि गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे.तसेच घरातील इतर मुलांपासून लांब राहावे.जेवणात मऊ अन्न खावे. तसेच पाणी,नारळ पाणी भरपूर घ्यावे. ह्या आजारावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे लसीकरण.लसीकरणाच्या वेळापत्रकानुसार ही लस बाळाला वयाच्या नवव्या आणि पंधराव्या महिन्यात देऊन घ्यावी. या लसीचा तिसरा डोस ४ ते ६ वर्षादरम्यान द्यावा. ही लस एम.एम.आर ह्या नावाने उपलब्ध आहे आणि ही गोवर, गालगुंड आणि रुबेला अशा तीन आजारांपासून बाळाचे संरक्षण करते अशी माहिती डॉ.कदम यांनी दिली आहे.**

जर मेंदूला संसर्ग झाला तर इन्सेफलाईटीससारखा आजार होऊ शकतो. जर कानाला संसर्ग झाला तर बहिरेपण येऊ शकते.मुलांमध्ये जनेंद्रियांना संसर्ग झाल्यास नपुंसकत्व आणि मुलींमध्ये अंडाशयाला संसर्ग झाल्यास मोठेपणी आई होण्यात अडचणी येऊ शकतात.

# बाप विषयावरील भाषणाने उपस्थित गहिवरले

## क्रिशाचे तालुका पातळीवर वक्तृत्व स्पर्धेत यश

**निघोज : प्रतिनिधी**

**बाप म्हणजे काय हे चिमुकली क्रिशाने सांगताच उपस्थितांना गहिवरून आले. संस्कारमय भाषणाचा परिपाठ देणाऱ्या गुणोरे शाळेतील मुख्याध्यापक सहीत सर्वच शिक्षकांचे पानोली येथील विविध गुणदर्शन स्पर्धेत कौतुक झाले आहे.**



जि.प .प्राथ .शाळा , गुणोरे . ता .पारनेर येथील विद्यार्थिनी कु . क्रिशा दतात्रय गोपाळे इयत्ता २ री हिने नुकत्याच पानोली येथे पार पडलेल्या तालुका स्तरावरील विविधगुणदर्शन स्पर्धेतीत किलबील गटातील वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत दैदिप्यमान यश संपादन केले . ती जेव्हा वडील (बाप ) या विषयावर आपले विचार मांडत होती तेव्हा प्रेक्षक भारावून गेले होते . तिने केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला होता . शाळेने केंद्रस्तरावर तब्बल सात बक्षिसे प्राप्त केली होती.

दरवर्षी गुणोरे शाळा विविध गुणदर्शन स्पर्धेत अग्रेसर असते . क्रिशाला तिच्या वर्गशिक्षिका व शाळेतील उपक्रमशिल आदर्श शिक्षिका सुजाता लाळगे , तसेच मालती राऊत यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले असे या प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक सुभाष लाळगे यांनी सांगितले . क्रिशाचे व सर्व शिक्षकवृंदांचे पारनेर तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सीमा राणे , पीएम पोषण अधिक्षक तथा शिक्षणविस्तार अधिकारी विनेश लाळगे, रावजी केसकर,केंद्रप्रमुख ज्ञानदेव क्षीरसागर तसेच गुणोरे गावचे सरपंच सुरेश ढवळे , उपसरपंच किशोर गोपाळे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय गोपाळे ,उपाध्यक्ष विकास साळवे तसेच गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी,पालक वर्ग अन् सर्व गुणोरे ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# बिबट्यांच्या मुक्त संचाराने धास्तावले सारोळकर

## वन विभागाने पिंजरा लावण्याची मागणी

**सारोळा अडवाई : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सारोळा अडवाई येथे बिबट्यांचा मुक्त संचार असून यामुळे गावकरी धास्तावलेले आहेत वनविभागाने त्वरित पिंजरा लावण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.**



या संदर्भातील माहिती अशी की सारोळा अडवाई गावाशेजारीच असणाऱ्या जामगाव येथील ऐतिहासिक राजवाडा परिसरात अनेक वर्षांपासून बिबट्यांचे वास्तव्य आहे.लगतच असणाऱ्या जामगाव सारोळा रस्त्यावर या बिबट्यांचे दर्शन घडत होते परंतु आता बिबट्यांनी आपला मोर्चा सारोळा अडवाई गावाकडे वळविला आहे दररोजच कोणत्या ना कोणत्या भागात तीन ते चार बिबट्यांचे दर्शन घडत असल्याने सारोळकर ग्रामस्थ धास्तावले आहेत.

सध्या ज्वारी, हरभरा, गहू, कांदा या पिकांची पाणी भरणी सुरू आहे. विजेच्या भारनियमणामुळे रात्रीच्या वेळेस शेतकऱ्यांना पाण्याची भरणी करावी लागते मात्र सायंकाळी सहा नंतरच बिबट्यांचा मुक्त संचार सुरू होत असल्याने शेतकरी पाणी भरण्यासाठी शेतात जाण्यास घाबरतात. वनविभागाने त्वरित पिंजरा लावून या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### शेतकरी वर्गात भीती

**दिवसभर भार नियमनामुळे वीज नसते, त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरावे लागते मात्र, बिबट्यांच्या मुक्त संचारामुळे शेतकरी वर्गात धास्ती निर्माण झाल्याने रात्री पाणी भरणे अवघड झाले आहे. वन विभागाने त्याची दखल घेऊन पिंजरे लावण्याची गरज आहे.**

**सौ.चंद्रकला आबूज**
**उपाध्यक्षा, वि.का.सेवा संस्था**

### भक्ष्यांच्या शोधासाठी संचार

**सारोळा अडवाई येथे कवड्या डोंगर आहे.येथे दाट जाडी असल्याने लपणक्षेत्र मोठया प्रमाणात आहे. त्यामुळेच या परिसरात वन्य जीव आहेत.या भक्ष्यांच्या शोधार्थच बिबट्यांचा वावर आहे.**

# सुपा ग्रामपंचायतीकडून आरोग्य उपकेंद्रास उपचार साहित्याचा पुरवठा

## रुग्ण सेवेसाठी मदत : सरपंच मनिषा रोकडे

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा ग्रामपंचायतीकडून सुपा येथील आरोग्य उपकेंद्रास फ्रिज सह उपचार व तपासणी साहित्य देण्यात आले. सुपा ग्रामपंचायतने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सुपा आरोग्य उपकेंद्रास त्यांच्या मागणीनुसार अत्यंत दर्जेदार असे आरोग्य तपासणी व उपचार साहित्य दिले आहे.**

यामध्ये बीपी ऑपरेटर , स्टेथोस्कोप,ऑटोक्लेव्हर मशिन, फ्रिज, एचबी मिटर, सतरंजी, क्लोरोस्कोप , थर्मामीटर आदी महत्त्वाचे साहित्य सुपा आरोग्य केंद्रास देण्यात आले.

औद्योगिक वसाहतीमुळे सुपा येथील रहिवाशी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणारी मदत अपुरी पडत आहे. सुपा आरोग्य उपक्रेंद्रात गरोदर, स्तनदामाता, लसीकरणाचे लहान बालके व शासनाचे विविध डोस यासाठी नेहमीच वरदळ असते.अशा वेळी शासनाकडून आवश्यक ती मदत पुरेशा प्रमाणात मिळण्यास अडचणी येत असतात. परंतु सुपा ग्रामपंचायत अशा वेळी आरोग्य केंद्रास भरीव व आवश्यक ती मदत करत असतात. सुपा ग्रामपंचायतने यापुर्वीही आवश्यक तेव्हा मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. तर उद्योजक योगेश रोकडे यांनी स्वतः भव्य दिव्य संरक्षण शेड बांधुन दिले आहे.

यावेळी सरपंच मनिषा रोकडे यांनी सांगितले की, सुपा आरोग्य उपकेंद्रात सुपा शहरासह परिसरातील गावातील नागरिक महिला लहान बालके उपचार लसीकरणासाठी येत असतात. त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आरोग्य केंद्रास साहित्य सह आवश्यक ती सर्व मदत सुपा ग्रामपंचायतीकडून पुरविली जाते व यापुढे ही अशीच मदत केली जाईल. जेणेकरुन आरोग्याच्या सुवेधेपासुन कुणाची गैरसोय होऊ नये.

सुपा आरोग्य उपकेंद्राच्या प्रमुख डॉ. विद्या बारवकर म्हणाल्या की, सुपा ग्रामपंचायतने मागणी नुसार आवश्यक ते व काही लागणारे साहित्य जे आम्ही मागितले नाही पण आरोग्य केंद्रास आवश्यक आहे असेही साहित्य दिले आहे. त्याबद्दल ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांचे आभार मानले आहे.

यावेळी उद्योजक योगेश रोकडे, उपसरपंच विजय पवार, ग्रामपंचायत सदस्य पप्पू पवार, प्रताप शिंदे, सौ. अनिता पवार, कामगार तलाठी शशिकांत मोरे, ग्रामविकास अधिकारी सुंबे भाऊसाहेब, सुपा आरोग्य केंद्राच्या प्रमुख डॉ. विद्या बारवकर, प्रविण शिंदे, अश्विनी भनगडे, विजय भोईर, योगीनी पवार, शारदा गायकवाड, कल्पना जाधव, सौ रेखा साळुंके, प्रंशात पवार, जावेद तांबोळी, विनित जाधव सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया – शरद रसाळ, सुपा)

### उद्योजक योगेश रोकडेंमुळे निवारा

**सरपंचपती उद्योजक योगेश रोकडे यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्वखर्चाने हजार ते दिड हजार स्केअर फुटांचे आरोग्य उपकेंद्रात शेड बांधुन दिल्याने येथे येणाऱ्या रुग्णाना ऊन , वारा , पावसात मोठा निवारा मिळला आहे, याचा उल्लेखही डॉ. विद्या बारवकर यांनी आपल्या आभार प्रदर्शनात आवर्जून केला.**

# साई दूध उद्योग समूह माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ - ज्येष्ठ पत्रकार दत्ताजी उनवणे

**निघोज : प्रतिनिधी**

**मंगेश लंके यांनी साई दूध उद्योग समूहाच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले असून कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली शिरुर व पारनेर तालुक्यातील शेतकरी दूध उत्पादनात समृद्ध झाल्याचे प्रतिपादन पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथील साई डेअरी फार्म या समूहाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उनवणे तसेच उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी साई डेअरी फार्मचे अध्यक्ष मंगेश लंके, सोपान सुपेकर तसेच त्यांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उनवणे यावेळी म्हणाले साई दूध डेअरी फार्मची दिनदर्शिका अतिशय माहितीपूर्ण असून ३६५ दिवस ही दिनदर्शिका जनतेला माहिती देणारी असल्याने ती घरोघर जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

साई दूध डेअरी फार्मचे अध्यक्ष मंगेश लंके यावेळी म्हणाले गेली पंधरा वर्षे दूध उद्योग व्यवसायात काम करताना नियमीत दूध उत्पादकांना पेमेंट तसेच इतर सोयी सवलती देऊन आपण दूध उत्पादकांना पाठबळ देण्याचे काम केले म्हणून दूध उद्योग समूहाच्या माध्यमातून नियमीतपणे चांगल्याप्रकारे संकलन होत असून निघोज आणी परिसरातील शेतकऱ्यांना पाठबळ देणे हे आपले कर्तव्य असून कर्तव्य भावनेतून आपण काम करीत असल्याने आपण या व्यवसायात यशस्वी झाल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांनीही आपल्या भाषणातून साई डेअरी फार्मचे अध्यक्ष मंगेश लंके यांचे कौतुक केले.

# पळव्यातील विकासकामे प्रगतीपथावर,लवकरच लोकार्पण

## सरपंच जनाबाई तरटे यांची माहिती



**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**पळवे खुर्द येथील विकास कामे प्रगती पथावर असून काही कामांच्या लोकार्पण झाले तर उर्वरित कामांचा लोकार्पण सोहळा लवकरच होणार असल्याची माहिती सरपंच जनाबाई तरटे यांनी दिली.**

यामध्ये बारगळ वस्तीवरील अंतर्गत ४.५ लाख किंमतीची गटार लाईन,१ लाख २० हजार रकमेचे जिल्हा परिषद शाळेची राळा घोटाई ,५० हजार रु. चे अंगणवाडी समोरील पेव्हिंग ब्लॉक या कामाचा समावेश असून अजून आर्थिक वर्षातील १० लक्ष किंमतीची कामे प्रगती पथावर असून त्याचेही लवकरच लोकार्पण होणार असल्याची माहिती सरपंच जनाबाई तरटे यांनी दिली.


या वेळी बाबाजी गाडीलकर,रावसाहेब बारगळ, रमेश शेळके,रोहिदास नवले,वसंतराव देशमुख,संजय तरटे,सेवा सोसायटीचे चेअरमन अंबादास तरटे मेजर,विजय शेलार, राजेंद्र शेलार,नानाभाऊ गाडीलकर प्रसाद भाऊ तरटे,बाळू जाधव,भिमाजी शेळके, मेजर भानुदास बारगळ ,पोपट इरकर,पोपट बारगळ,शांताराम तरटे,मेजर पोपट पाचरणे, दुधीनाथ देशमुख,अशोक गवळी, राजेंद्र शेळके,शांताराम देशमुख,नारायण गाडीलकर, संदीप देशमुख,सचिन बारगळ, अमोल तरटे,नंदकुमार तरटे अमोल शेळके ,उपसरपंच अमोल जाधव मा. उपसरपंच संजय नवले सौ.संगीता शेलार मा.सरपंच सौ.सरिता जगताप,रमेशनाना पाचरणे,दत्ता गाडीलकर,सौ.बायजाबाई इरकर,सौ.कविता गाडीलकर आदी ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेविका सौ.अवधूत मॅडम व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डीत शुक्रवारपासून ध्यानधारणा शिबिर

## आद्य कार्यान्वयन समितीच्या वतीने आयोजन

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**आद्य परम सद्गुरु स्वामी शिवानंद दादाजी यांच्या कृपाशिर्वादाने शुक्रवार दि. १९ ते रविवार दि.२१ पर्यंत तीन दिवसीय भव्य ध्यानधारणा शिबिर कै. सुमनताई ढाकणे प्रतिष्ठान ता. पाथर्डी येथे आद्य उपक्रम कार्यान्वयन समिती तर्फे आयोजित करण्यात आलेले आहे. तरी साधकांनी या सुवर्णसंधीचा आवश्य लाभ घ्यावा व उच्च कोटीचे दिव्य आध्यात्मिक अनुभव प्राप्त करून घ्यावेत असे आवाहन ओम आद्य स्वामी शिवानंद दादाजी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.**



आद्य स्वामी शिवानंद दादाजींनी ध्यान धारणे विषयी माहिती देताना सांगितले की ध्यान धारणेमुळे ताणतणावापासून मुक्तता मिळते तसेच आपले आरोग्य चांगले राहते आपल्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते त्यामुळे अध्यात्मिक मार्गात आपली प्रगती होते तसेच मन नेहमी प्रसन्न राहते नकारात्मक ऊर्जा नष्ट होते त्यामुळे आपले मन शांत राहते व आपले आत्मकल्याण होते. तसेच या ठिकाणी निवृत्ती लोंढे, बबनराव खेडकर, आमोद नलगे सर, शिवाजीराव लोंढे, संजय डहाळे, शेखर कुलकर्णी, जगन्नाथ जाधव, भास्कर कापरे, कृष्णा जंजिरे, बाळासाहेब झाडे, संतोष मेहेर, सुरेश कुताळ आदींशी साधकांनी संपर्क साधावा.

या ठिकाणी चहा पाणी नाश्ता महाप्रसाद तसेच पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे अशी माहिती ओम आद्य स्वामी शिवानंद दादाजी परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन श्री श्री महान १००८ धुनीवाले धनंजय सरकारजी यांच्यामार्फत होणार आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com